# मोठा मोठा! खूप मोठा! व्हेल!



एक जुनी लोककविता

नितिशा महापाला यांची चित्रे

कथाचे ३००एम थिंकबुक



मोठा, मोठा व्हेल


लांब, लांब व्हेल

व्हेल असतो खूप जाडा!





व्हेल, दे तुझ्या शेपटीला झटका!



व्हेल उच्छ्वासातून फवारतो पाणी!



व्हेल पोहतो समुद्राखाली!



# अप्रतिम सभ्य महाकाय प्राणी!


ज्याच्या तोंडात १०० माणसे मावतात, असा कोण आहे ते ओळखा पाहू?

आणि ज्याचं हृदय एका कारएवढं मोठं असतं असा कोण असेल बरं?

ब्ल्यू व्हेल हा सौम्य असतो आणि महाकाय असतो. तो अतिप्रचंड असतो. त्याच्या जीभेचं वजन जवळपास एखाद्या हत्तीच्या वजनाएवढं असतं. ब्ल्यू व्हेल हा पृथ्वीवरील सर्वात महाकाय प्राणी आहे. पण ब्ल्यू व्हेलचं खाद्य काय आहे माहीत आहे का? तो खातो छोट्या शिंपल्यांसारखे क्रिल नावाचे जीव. पण ब्ल्यू व्हेलला दररोज ३६०० किलो क्रिलची आवश्यकता असते.

# तो आहे ब्ल्यू व्हेल!

प्रतिमा सौजन्य: Wikimedia Commons



- ब्ल्यू व्हेलच्या पिल्लाची लांबी साधारण २५ फुट असते.
- ब्ल्यू व्हेलच्या पिल्लाचं वजन ३ टन असतं आणि त्यांची लांबी २५ फुट असते.
- ब्ल्यू व्हेलचं पिल्लू दररोज १०० गॅलन दुध पितं आणि दर दिवशी त्याचं वजन सुमारे ३०० पौंडांनी वाढतं म्हणजे तासाला ९ पौंड.
- ब्ल्यू व्हेलच्या मुख्य रक्तवाहिन्यांमधून माणूस सहज पोहू शकतो.
- ब्ल्यू व्हेलच्या एका श्वासातल्या हवेने तब्बल २००० फुगे फुगवले जाऊ शकतात.
- ते पृथ्वीवरचे सर्वात मोठे प्राणी आहेत, तरीही ते माणसाला घाबरतात! कारण या सौम्य स्वभावाच्या अनेक महाकाय ब्ल्यू व्हेल्सची माणसांनी हत्या केली आहे.
- पण तुम्ही ब्ल्यू व्हेलला मदत करू शकता. “कृपया ब्ल्यू व्हेल्सना, आणि आमच्या समुद्रांना आणि महासागरांना वाचवा!”, अशा आशयाचे पत्र आपल्या वर्ल्ड लीडर्सना लिहा.

गीता धर्मराजन यांना मुलांसाठी गोष्टी लिहायला आवडतात. टारगेट या मुलांच्या नियतकालिकाच्या आणि पेनिसिल्व्हेनिया विद्यापीठाच्या द पेनिसिल्व्हेनिया गॅझेट या नियतकालिकाच्या त्या संपादक होत्या. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना २०१२ साली पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नितिशा मोहापात्रा ग्राफिक डिझायनर, इलस्ट्रेटर आणि फोटोग्राफर आहेत. बंगळुरू येथील सृष्टी इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट, डिझाइन अँड टेक्नोलॉजी या संस्थेतून त्यांनी पदवी संपादन केली. व्हिज्युअल कम्युनिकेशन डिझाइन हा त्यांचा प्रमुख विषय होता.

## KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

"भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा." **- नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

"कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो."
**- चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

"कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते"
**- टाइम आउट**

"मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे" **- प्रेपरटायगर्स**

एका जुन्या स्थानिक कवितेचा अनुवाद गीता धर्मराजन यांनी केला आहे.

I LOVE READING

प्रथम आवृत्ती वर्ष २०२१
कॉपीराइट © कथा, २०२१
मजकूराचा कॉपीराइट © गीता धर्मराजन
इलस्ट्रेशन कॉपीराइट © कथा
ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6

**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!
कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.


सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.
या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.



ही सर्व आयएलआर पुस्तके

इंडिगो सीरिजमध्ये

मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा







































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

"गोष्टींच्या माध्यमातून बहुविध भारताची ओळख."
- द पायोनिअर

मुलांसाठी

'कथा'चे पुस्तक

ISBN 978-93-88284-81-3

9 789388 284813

` XXX

www.katha.org